महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/कोव्हिड-१९ लसीकरण/२०२१/४९२५४ दिनांक : २१.१०.२०२१.

**तातडीचे/महत्वाचे परिपत्रक:**
**(कालमर्यादा : दि. २२.१०.२०२१ दुपारी ३.०० वाजेपर्यंत)**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय : विद्यार्थ्यांचे कोव्हिड-१९ लसीकरण "मिशन युवा स्वास्थ्य"**
**(२५ ऑक्टोंबर २०२१ ते ०२ नोव्हेंबर २०२१)**

उपरोक्त विषयास अनुसरुन, महाराष्ट्र शासनाच्या **उच्च व तंत्रशिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांचे संयुक्त विद्यमानाने** दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ ते ०२ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीमध्ये महाविद्यालयांमध्ये शिकत असणा-या पात्र विद्यार्थ्यांचे त्यांच्याच महाविद्यालयामध्ये कोव्हिड-१९ प्रतिबंधक लसीकरण करण्याकरीता **"मिशन युवा स्वास्थ्य"** चे आयोजन केलेले आहे.

या अनुषंगाने, आपल्या महाविद्यालयामधील लस घेण्याकरीता पात्र असलेल्या परंतू अद्यापपर्यंत कोव्हिड-१९ लस (१ ला डोस/२ रा डोस) न घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या लिंकद्वारे गुगल फॉर्म मध्ये **दिनांक २२.१०.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** न चूकता अद्ययावत करावी. आपण सादर केलेल्या माहितीनुसार आपल्या महाविद्यालयामध्ये कोव्हिड-१९ प्रतिबंधक लसीच्या डोसचे नियोजन करण्याकरीता सदर माहिती संचालनालयास सादर करण्यात येणार आहे. संस्थांनी त्यांच्या संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी / महानगरपालिकांचे वैद्यकीय अधिकारी यांचेशी समन्वय साधून सदर लसीकरण शिबीराचे आयोजन करावे व या मोहिमेकरिता आवश्यक सर्व सोयी सुविधा आपल्या महाविद्यालय स्तरावर उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

या मोहिमेकरिता संबंधित जिल्ह्यातील प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच **"मिशन युवा स्वास्थ्य"** मध्ये जी महाविद्यालये चांगली कामगिरी बजावतील, अशा महाविद्यालयांना माननीय मंत्री महोदय यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

सोबत : गुगल फॉर्म लिंक : https://forms.gle/agr3oFjNMWkPpw767

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीस्तव सादर.